# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०६/०४/२०१७

मा पोलीस अधिक्षक सा़ो. गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर आळा घालण्याकरीता अवैध दारु रेडसंबंधाने स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी सोपविली. जबाबदारी पार पाडतांना पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे, स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ०२/०४/२०१७ रोजी पोलीस पथकाने मौजा कसनसुर सारख्या अतिसंवेदशील जंगल भागात पोहचुन २९,४०,०००/- रुपयाची विदेशी दारु तसेच १६,००,०००/- दारु पुरवठा करीता वापरलेले वाहन अशा प्रकारे एकूण ४५,४०,०००/- रुपयाचा माल आरोपितांचे ताब्यातून जप्ती करण्यात आला होता. तपासामध्ये गुन्हयातील आरोपी गोपाल जगदिश मुजुमदार यांचा पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला रिमांड दरम्यान आरोपीचे सांगणेवरुन दिनांक ०४/०४/२०१७ रोजी तपासी अधिकारी यशवंत नलावडे, सोबत पोउपनि सुनील इंगळे, पोकर्म. बोरकर, दुर्गे, उंदिरवाडे, सहारे, वाळके, नरोटे, चवारे, पातकमवार, तवाडे अशा पोलीस पथकाने उपपोस्टे कसनसुर हद्दितील मौजा चोखेवाडा येथील एका इसमाचे घरी साठवणूक करुन ठेवलेला विदेशी दारुचे एकूण ४८ सिलबंद बॉक्स किंमत ४,६०,०००/- रुपयाचा माल आरोपीने काढुन दिल्याने जप्ती केला.

अशाप्रकारे मा. पोलीस अधिक्षक सा़ो. गडचिरोली यांचे आदेशान्वये व त्यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एकुण ५०,००,८००/- रुपये पन्नास लाख आठसे रुपयाचा अवैध दारुचा साठा जप्ती केला असून आजपर्यंतचे इतिहासातील सर्वात मोठी कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेकडून झाली असून अवैध दारु विक्रेत्यांविरुध्द मोहिम अधिक तिव्र करण्यात आलेली आहे.


48 x 180 ML. R